# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३९१/प्रनिप्रा/१९ मे/२०२५/ 546 दिनांक : 22 MAY 2025

## :: १०१व्या बैठकीचे इतिवृत्त ::

**श्री. समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से. (से.नि.), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक १९ मे, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **१०१व्या बैठकीचे इतिवृत्त,-**

सदरील बैठकीस श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, १) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, ३) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व ४) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे अनुपस्थित होते. याबाबत नोंद घेण्यात आली.

तसेच १) डॉ. वाय.सी. साळे, संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व २) श्री. महेंद्र कोठावदे, उपकुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे) विशेष निमंत्रित उपस्थित होते.

हि बैठक कोरम (Quoram) अभावामुळे अर्धा तास तहकुब करुन त्याच ठिकाणी घेण्यात आली

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण मुंबई, महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक १ : प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ व १७/०४/२०२५ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.**

प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ व १७/०४/२०२५ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या मान. सदस्य यांना पाठवून त्यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. या संदर्भात इतिवृत्ताच्या सुधारणेबाबत कोणतेही अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत, त्यानुसार सदरील बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले.

**विषय क्रमांक २ : प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ व १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.**

**बैठक दिनांक : १६/०४/२०२५**

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १. | - | प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ व १७/०४/२०२५ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त. | प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ व १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक ०७/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले होते. | याबाबत सदस्यांकडून कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्याने इतिवृत्तांस मान्यता प्रदान करण्यात आली. |
| २. | २ | प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२४ व २०/०१/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.<br>निर्देश : प्राधिकरणाच्या दिनांक २०/०१/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४ व ५ मध्ये प्राधिकरणाने पारीत केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी / कर्मचारी डॉ. मंगेश निकम व श्री. सिध्देश नर यांनी सादर केलेल्या खुलाशाबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी प्रस्तूत प्रकरणी शहानिशा / तपासणी करुन त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल प्राधिकरणास सादर करावा, असे निर्देश देण्यात आले. | याप्रकरणी कार्यवाही करण्यात येत असल्याबाबत आयुक्त यांनी मौखिकरित्या सांगितले. | प्रस्तूत प्रकरणी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांना पुढील बैठकीत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले<br>अध्यक्ष<br>प्रवेश नियामक प्राधिकरण<br>मुंबई, महाराष्ट्र राज्य |

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ३. | ३ | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे अधिनियम, २०१५ च्या तरतूदींनुसार विनियम व नियम मसुदा तयार करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उपसमितीद्वारे सादर करण्यात आलेल्या अंतरिम अहवालाबाबत.<br>निर्देश /निर्णय : सदरील मसूदा विनियम व नियम प्राधिकरणाच्या व उपसमितीच्या सर्व संबंधित सदस्यांना पाठवुन त्यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले, तसेच या संदर्भात सर्व संबंधित उपसमिती सदस्य यांच्या समवेत सविस्तर चर्चा करण्याकरिता मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी बैठक आयोजित करण्याबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना निर्देश दिले. | या संदर्भात मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८/०४/२०२५ रोजी उपसमितीची बैठक घेण्यात आली असून, प्रस्तूत प्रकरणी या बैठकीत विषय क्रमांक ०४ वर चर्चेसाठी /निर्णयासाठी ठेवण्यात आले आहे. | केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
| ४. | ४ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक २५/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशांनुसार Single Window System for NRI/PIO/OCI and International student admission या संदर्भात कार्यवाही करण्यास प्राधिकरणाच्या मान्यतेबाबत. | सदर प्रकरणी अहवाल मा. आयुक्त यांनी प्राधिकरणास वस्तूस्थिती सादर केली. | १) NRI / OCI / PIO / FN आणि CIWGS या प्रकारातील परदेशी विद्यार्थ्यांकरिता प्रवेश अर्ज सादर करण्यापासून ते प्रत्यक्ष संस्थेत प्रवेशित होईपर्यंत (End to End) प्रकाराची सुविधा असलेल्या पोर्टलची निर्मिती करण्यात येणार असून त्यामुळे उमेदवारांना सुरळीत व सुलभरितीने प्रवेश प्रक्रिया करणे शक्य होईल उमेदवारांना या |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | निर्देश : याबाबतच्या RFP चा मसूदा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी मा. अध्यक्ष यांना सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वरील सर्व बाबींची पूर्तता करुन या संदर्भातील निर्णय प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत घेण्यात येईल | | व्यतिरिक्त Value added Services चा लाभ देणे शक्य होईल.<br><br>२) सदर प्रकल्प हा सीईटी कक्षाकरिता Revenue Generation Model असेल. यासाठी सेवा पुरवठादाराला कोणतेही शुल्क अदा करावे लागणार नाही. सद्यस्थितीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या RFP निविदेनुसार सेवापुरवठादाराला उमेदवारांकडून आकारण्यात येणाऱ्या अंदाजत नोंदणी शुल्क (५० USD) आणि अंदाजित प्रवेश प्रक्रिया शुल्क (११५० USD) यामधून राज्य सीईटी कक्षाचा वाटा आणि सेवापुरवठादाराचा वाटा किती असेल याबाबत Commercial bid मध्ये ठरविण्यात येणार असल्याचे आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केले. प्राधिकरणाची त्यास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| ५. | ५ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तंत्र शिक्षण विभागा अंतर्गत व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे. | या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्णयानुसार विहित कालावधीमध्ये प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्याबाबतचे निर्देश सर्व संबंधित संचालकांना दिनांक २२/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले, | केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.<br><br>तसेच १) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी वेळापत्रक तयार करावे. २) |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | निर्देश : .......सर्व संचालकांना त्यांचे मार्फत महाविद्यालयांची पडताळणी विहित वेळेत पूर्ण करण्याबाबत कळविण्याचे निर्देश दिले. सदस्य सचिव, प्रवेश नियामाक प्राधिकरण, मुंबई यांनी या प्रकरणी आवश्यक कार्यवाही त्वरीत करावी | तसेच संबंधित महाविद्यालयांना कळविण्याचे निर्देश दिले आहेत. | व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी सादर करावी. |
| ६. | ६ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲण्ड रिसर्च, पुणे EN६८२२ या महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा रद्द केलेला प्रवेश पुनर्स्थापित करणेबाबत (कु. शिवेंद्र जाधव, EN२४३१९०६१)<br>निर्णय / निर्णय : ....... विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित लक्षात घेता कु. शिवेंद्र जाधव (EN२४३१९०६१) याच्या प्रथम वर्ष ENTC अभियांत्रिकी या अभ्यासक्रमातील प्रवेशास प्राधिकरणाची दंडात्मक कारवाई करुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे. | पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲण्ड रिसर्च, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. शिवेंद्र जाधव यांच्या प्रवेश मान्यते बाबत प्राधिकरणाचा निर्णय महाविद्यालय व संबंधित विद्यार्थी यांना दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आला आहे. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार दंडाची पूर्तता पंधरा दिवसांच्या आत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने संबंधित महाविद्यालयाकडून अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. |
| ७. | ७ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज, पुणे DSE६१७७ या महाविद्यालयातील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा जात वैधता प्रमाणपत्राअभावी पोर्टलवर रद्द केलेला प्रवेश नियमित करणेबाबत. (कु. संस्कार राजकुमार साठे) | सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. संस्कार राजकुमार साठे यांच्या प्रवेश मान्यते बाबत प्राधिकरणाचा निर्णय दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये महाविद्यालय व संबंधित विद्यार्थी | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार दंडाची पूर्तता पंधरा दिवसांच्या आत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने संबंधित महाविद्यालयाकडून अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | निर्णय / निर्देश : प्रवेशित विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे येथील थेट द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यासक्रमात कु. संस्कार राजकुमार साठे याच्या प्रवेशास प्राधिकरणाची दंडात्मक कारवाई करुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे. | यांना कळविण्यात आला आहे. | |
| ८. | ८ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये इंद्रायणी महाविद्यालय, पुणे या महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रमास प्रवेशित कु. श्रावणी बबण रनवरे या विद्यार्थिनीच्या प्रवेश मान्यतेबाबत.<br>निर्देश / निर्णय : विद्यार्थीनीची जात वैधता प्रमाणपत्र विहित कालावधीमध्ये उपलब्ध नसताना सुध्दा महाविद्यालयाने कु. श्रावणी यांना प्रवेश दिला, ही बाब गंभीर स्वरुपाची असून या संदर्भात महाविद्यालयाने त्यांचा स्वयंस्पष्ट खुलासा त्वरीत सादर करावा | इंद्रायणी महाविद्यालय, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ येथील बी.सी.ए. अभ्यासक्रमास प्रवेशित कु. श्रावणी बबण रनवरे या विद्यार्थिनीच्या प्रवेश मान्यतेबाबत प्राधिकरणाचा निर्णय दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहेत. | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. तसेच महाविद्यालयाने प्राधिकरणाच्या निर्देशानुसार पंधरा दिवसांत खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले. |
| ९. | ९ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर EN६०२८ या महाविद्यालयातील ०२ विद्यार्थ्यांचे प्रवेश EWS संवर्गामधून पुर्ववत होण्याबाबत. | तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. भोसले आदित्य अतुल व कु. नलवडे | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | निर्देश / निर्णय : विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित व शासनाच्या दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या पत्रातील निर्देश विचारात घेऊन एक वेळची विशेष बाब म्हणुन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर येथील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. भोसले आदित्य अतुल व कु. नलवडे समृद्धी सतीश या दोनही विद्यार्थ्यांना EWS प्रवर्गातून प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे | समृद्धी सतीश या दोन्ही विद्यार्थ्यांच्या EWS संवर्गातील प्रवेश मान्यते बाबतचा प्राधिकरणाचा निर्णय महाविद्यालय व संबंधित महाविद्यालयांना दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आला आहे. | |
| १०. | १० | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन पी.टी.व्ही.ए. इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, मुंबई या महावद्यिालयातील एमबीए अभ्यासक्रमास टिएफडब्ल्युएस प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या कु. अनिकेत अनिल दोडेकर या विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेबाबत.<br>निर्देश / निर्णय : विद्यार्थ्याकडे उत्पन्न प्रमाणपत्र विहित कालावधीमध्ये उपलब्ध नसताना महाविद्यालयाने कु. अनिकेत यांना प्रवेश दिला ही, बाब गंभीर स्वरुपाची असून या संदर्भात महाविद्यालयाने त्यांचा स्वयंस्पष्ट खुलासा प्राधिकरणास त्वरीत सादर करावा | पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन पी.टी.व्ही.ए. इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील एमबीए अभ्यासक्रमास टि.एफ.डब्ल्यु.एस. प्रवर्गातून प्रवशित . अनिकेत अनिल दोडेकर यांच्या प्रवेश मान्यते बाबत प्राधिकरणाचा निर्णय संबंधित महाविद्यालयांना दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आला आहे.. | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. तसेच महाविद्यालयाने प्राधिकरणाच्या निर्देशानुसार पंधरा दिवसांत खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ११. | ११ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये बीबीए/बीसीए/बीएमएस/बीबीएम, एमसीए आणि एमबीए/एमएमएस या अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत व संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेमधील प्रवेशांबाबत.<br><br>निर्देश / निर्णय : ....... दर्शविलेल्या त्रुटी संदर्भात संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडून अहवाल प्राप्त करुन प्राधिकरणासमोर अंतिम मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.<br><br>तसेच भविष्यात अशा प्रकारच्या चूका महाविद्यालयांकडून पुनश्च झाल्यास अधिनियम २०१५ कलम २० अन्वये संबंधित संस्था दंडात्मक कारवाईस पात्र ठरतील, याबाबत सर्व संस्थांना नोंद घेण्याबाबत कळवावे, असे ठरविण्यात आले. | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये बीबीए/बीसीए/बीएमएस/बीबीएम, एमसीए आणि एमबीए/एमएमएस या अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत व संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेमधील प्रवेश मान्यते बाबत प्राधिकरणाचे निर्देश संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना दिनांक १५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहेत. | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी संचालक यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यता प्रस्तावांसोबत विषयांकित प्रवेश मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

3401



| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १२. | १२ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये के.डी.एम्.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे येथे व्यावसायिक पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. विश्वनाथ सत्यवान माळी या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत मा. उच्च न्यायालयाचे, संभाजीनगर खंडपीठ येथे दाखल याचिका क्र. १९०४/२०२५ मधील दिनांक १२/०२/२०२५ रोजीचे पारित आदेश.<br>निर्देश / निर्णय : ....... प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत महाविद्यालय आणि कु. विश्वनाथ माळी यांना सुनावणीसाठी बोलाविण्याचे निर्देश देण्यात आले. | के.डी.एम्.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. विश्वनाथ सत्यवान माळी यांच्या प्रवेश प्रकरणी सुनावणीस हजर राहण्याबाबत प्राधिकरणाचे निर्देश संबंधित महाविद्यालयास दिनांक ०९/०५/२०२५ रोजी ईमेलद्वारे कळविण्यात आले असुन प्राधिकरणाचा दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत सुनावणीसाठी बोलाविण्यात आले आहे. | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. यासंदर्भात प्राधिकरणाच्या दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत विषय निर्णयाकरिता ठेवण्यात आले असल्याचे नमूद करण्यात आले. |
| १३. | १३ | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील गट अ व गट ब संवर्गामध्ये प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत.<br>निर्देश / निर्णय : ....... सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी याबाबत कार्यवाही करण्योच निर्देश देण्यात आले. | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील गट अ व गट ब संवर्गामध्ये प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत प्राधिकरणाचा निर्णय शासनास दिनांक ३०/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये इच्छूक अधिकारी / कर्मचारी यांना अवगत करण्याबाबत विनंती केली आहे. तसेच याबाबत प्रतिनियुक्तीने येण्यास इच्छूक अधिकारी उपलब्ध होण्यासाठी संबंधित संचालकांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. तसेच सदर प्रकरणी राज्य शासनाकडे तसेच संबंधित संचालकांकडे पाठपुरावा करणे. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १४. | १४ | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक् प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही कार्यालयांशी संबंधित मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी उच्च न्यायालयातील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी पॅनलवरील नियुक्त वकीलांच्या शुल्क वाढीबाबत.<br>निर्देश / निर्णय : ....... महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तसेच इतर प्राधिकरण स्तरावर पॅनलवरील नियुक्त वकिलांच्या शुल्काबाबत माहिती प्राप्त करुन त्यांचा अभ्यास करुन परिपूर्ण प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले व तद्नंतर याबाबत रुपरेषा निश्चित करण्यात येईल, असे ठरविण्यात आले. | सदर प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. यासंदर्भात प्राधिकरणाच्या दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत विषय निर्णयाकरिता ठेवण्यात आले असल्याचे नमूद करण्यात आले. |

**<u>बैठक दिनांक : १७/०४/२०२५</u>**

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १. | १ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील उच्च शिक्षण व कृषी शिक्षण शिक्षण विभागा अंतर्गत व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे | या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्णयानुसार विहित कालावधीमध्ये प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्याबाबतचे निर्देश सर्व संबंधित संचालकांना<br>दिनांक २२/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | निर्देश / निर्णय : ....... प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ५ मधील निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. | संबंधित महाविद्यालयांना कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. | |
| २. | २ | मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अभ्यासक्रम-निहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर.<br>निर्देश / निर्णय : ....... महाविद्यालयांवर यादीतील त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार अधिनियम २०१५ मधील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करुन प्रवेशास मान्यता देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. | उक्त प्रकरणी प्रपत्र - अ मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना मान्यता देण्यात आलेला प्राधिकरणाचा निर्णय व महाविद्यालयांवर करण्यात आलेली दंडात्मक कारवाई बाबतचा प्राधिकरणाचा निर्णय सर्व संबंधितांना महाविद्यालय व विद्यार्थी यांना दिनांक ०५/०५/२०२५, १४/०५/२०२५ व १५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आला आहे. तसेच सदरील निर्णय संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. दंडात्मक कारवाई करण्याबाबत आलेल्या महाविद्यालयांना १५ दिवसात अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. |
| ३. | ३ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ए.सी.पी.एम. चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. (Discrepancy - Candidate was not registered with State CET Cell). | ए.सी.पी.एम. चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. श्रीराम राघवेंद्र कुलकर्णी यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाच्या निर्णयानुसार खुलासा सादर करण्याबाबत संबंधित महाविद्यालयास दिनांक | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. यासंदर्भात महाविद्यालयाचा खुलासा प्राप्त करुन प्रकरण पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | निर्देश / निर्णय : ....... ए.सी.पी.एम.चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांनी सदरील प्रवेश केला, याबाबतचा वस्तूस्थितीदर्शक अहवाल महाविद्यालयाकडून प्राप्त करुन घेण्याचे निर्देश प्राधिकरणाने दिले.<br><br>सदरील अहवाल प्राप्त झाल्यावर सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी तपासणी / छाननी करुन त्यांचे अभिप्राय प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश आहेत. | १३/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. | |
| ४. | ४ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, ठाणे सब कॅम्पस, स्कुल ऑफ लॉ, ठाणे या महाविद्यालयात एल.एल.बी ५ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीमध्ये कु. खुशी सुजय सरकार या विद्यार्थिनीचे नाव समाविष्ट करुन प्रवेशास मान्यतेबाबत. | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, ठाणे सब कॅम्पस, स्कुल ऑफ लॉ, ठाणे या महाविद्यालयात एल.एल.बी ५ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित कु. खुशी सुजय सरकार यांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्रवेशाची रितसर नोंदणी करण्याबाबत राज्य | कु. खुशी सुजय सरकार या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची रितसर नोंद घेण्याची प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या स्तरावर पूर्ण करण्याबाबत सीईटी कक्षास कळविण्यात यावे व प्रवेशाची पडताळणी करण्याबाबत |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | निर्देश / निर्णय : ....... कु. खुशी सुजय सरकार यांचे शैक्षणिक हित विचारात घेता आणि राज्य सामईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांच्या उपरोक्त अहवालानुसार कु. खुशी सुजय सरकार यांच्या प्रवेशाची रितसर नोंदणी करण्यास व प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून निष्काळजीपणा झाला असल्याची बाब स्पष्ट आहे व सदरील बाब गंभीर स्वरुपाची असून या संदर्भात महाविद्यालयाने त्यांचा स्वयंस्पष्ट खुलासा प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. | सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास कळविण्यात आले आहे व प्राधिकरणाच्या निर्णयानुसार खुलासा सादर करण्याबाबत महाविद्यालयास दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहेत. | संचालक उच्च शिक्षण यांना कळविण्यात यावे.<br><br>यासंदर्भात महाविद्यालयाचा खुलासा प्राप्त करुन प्रकरण पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले.<br><br>महाविद्यालयाने कु. खुशी सरकार यांच्या प्रवेशाची पडताळणी संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडून करुन त्याचा अहवाल अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. |
| ५. | ५ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सन्मती इंजिनियरींग कॉलेज, वाशिम या महाविद्यालयातील प्रवेशित ०२ विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रवर्ग (Category) OBC ऐवजी OPEN अशी दुरुस्ती करुन देण्याबाबत.<br><br>निर्देश / निर्णय : ....... विद्यार्थ्यांचा प्रवर्ग Auto convert होऊन खुला प्रवर्गात झालेला असताना सुध्दा प्राधिकरणाच्या मान्यता पत्रात ओ.बी.सी. प्रवर्ग असा नमूद करण्यात आल्याबाबत सविस्तर खुलासा सेवापुरवठार यांच्याकडून घेऊन आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी प्राधिकरणास सादर करवा. | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सन्मती इंजिनियरींग कॉलेज, वाशिम या महाविद्यालयातील प्रवेशित ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाचा निर्णय संबंधित महाविद्यालयास दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. यासंदर्भात संबंधितांचा खुलासा प्राप्त करुन प्रकरण पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ६. | ६ | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर PH२५७७ या महाविद्यालयात प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली या विद्यार्थिनीने प्रवेश मान्यतेकरिता Restoration Application: U/O - ९ Rule - ४ of Civil Procedure Code, १९०८ सादर केले आहे.<br>निर्देश / निर्णय : ....... संचालनालय, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी तपासणी करुन सदरील प्रकरण प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर येथील प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली यांच्या प्रवेश प्रकरणी पाधिकरणाच्या निदे्रशानुसार तपासणी अहवाल सादर करण्याबाबत तंत्रशिक्षण संचालकांना दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. यासंदर्भात प्राधिकरणाच्या दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत विषय निर्णयाकरिता ठेवण्यात आले असल्याचे नमूद करण्यात आले. |
| ७. | ७ | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये झील एज्युकेशन सोसायटी, झील इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, नऱ्हे, पुणे (MB६१९५) या महाविद्यालयात एमबीए अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दिव्या झिलु वरक या विद्यार्थिनीच्या प्रवेश मान्यतेबाबत. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये झील एज्युकेशन सोसायटी, झील इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, नऱ्हे, पुणे येथील प्रथम वर्ष एमबीए या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दिव्या वरक व कु. नम्रता कांबळे यांच्या प्रवेश मान्यते बाबत प्राधिकरणाचा | केलेल्या कार्यवाही नोंद घेण्यात आली. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | निर्देश / निर्णय : ....... विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता झिल इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्पुटर ॲप्लिकेशन, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष एमबीए या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दिव्या वरक व कु. नम्रता कांबळे यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. | निर्णय संबंधित विद्यार्थी व महाविद्यालयास दिनांक १३/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. | |
| ८. | ८ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक कृषि अभ्यासक्रमास कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर, सोनई नेवासा, अहमदनगर येथील प्रवेशित कु. सार्थक राजु नरोडे यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.<br>निर्देश / निर्णय : ....... विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता मुळा एज्युकेशन सोसायटीचे कृषि महाविद्यालय, सोनई, जिल्हा अहमदनगर येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक कृषी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. सार्थक राजु नरोडे यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक कृषि अभ्यासक्रमास कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर, सोनई नेवासा, अहमदनगर येथील प्रवेशित कु. सार्थक राजु नरोडे यांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्राधिकरणाचा निर्णय संबंधित विद्यार्थी व महाविद्यालयास दिनांक १३/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. | केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ९. | ९ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंत प्राप्त झालेल्या व तत्कालीन मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या स्तरावर अमान्य झालेल्या पुनर्विलोकन याचिका प्रकरणी संबंधित महाविद्यालये व विद्यार्थी यांनी सादर केलेल्या समर्पक कागदपत्रांच्या अनुषंगाने पुनश्च शहानिशा/तपासणी करुन पात्रतेबाबतचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्याच्या निर्देशांकरिता.<br>निर्देश / निर्णय : ....... सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी प्राधान्य क्रमाने छाननी / पडताळणी / तपासणी करुन त्याचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी तीन महिन्यांच्या आत सादर करवा, असे निर्देश देण्यात आले. | कार्यवाही करुन अहवाल प्राधिकरणा समोर निर्णयाकरिता सादर करण्यात येत आहे. | प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत तपासणी / छाननी करण्यात आलेली प्रकरणे निर्णयाकरिता सादर करण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले. |
| १०. | १० | माहे ऑगस्ट २०२४ नंतर प्राप्त झालेल्या पुनर्विलोकन याचिकांमध्ये प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २० जानेवारी २०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ११ मधील निर्देशांनुसार प्रवेश मान्यतेच्या याचिका प्रकरणी पडताळणी करुन पात्रतेबाबतचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्याच्या निर्देशांकरिता. | कार्यवाही करुन अहवाल प्राधिकरणा समोर निर्णयाकरिता सादर करण्यात येत आहे. | प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत तपासणी / छाननी करण्यात आलेली प्रकरणे निर्णयाकरिता सादर करण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | निर्देश / निर्णय : ....... सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी प्राधान्य क्रमाने छाननी / पडताळणी / तपासणी करुन त्याचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी तीन महिन्यांच्या आत सादर करवा, असे निर्देश देण्यात आले. | | |
| ११. | ११ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतच्या विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी नव्याने प्राप्त झालेल्या पुनर्विलोकन याचिकांप्रकरणी पडताळणी करुन पात्रतेबाबतचा अहवाल प्राधिकरणा समोर मान्यतेसाठी सादर करण्याच्या निर्देशांकरिता.<br>निर्देश / निर्णय : ....... सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी प्राधान्य क्रमाने छाननी / पडताळणी / तपासणी करुन त्याचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी तीन महिन्यांच्या आत सादर करवा, असे निर्देश देण्यात आले. | कार्यवाही करुन अहवाल प्राधिकरणा समोर निर्णयाकरिता सादर करण्यात येत आहे. | प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत तपासणी / छाननी करण्यात आलेली प्रकरणे निर्णयाकरिता सादर करण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले.<br>अध्यक्ष<br>प्रवेश नियामक प्राधिकरण<br>मुंबई, महाराष्ट्र राज्य |

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही | निर्णय / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १२. | १२ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश मान्यता प्रस्ताव विहीत कालावधीत सादर न केल्यामुळे अधिनियम, २०१५ मधील कलम २० मधील तरतुदींनुसार शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत लेखी समर्पक खुलासा सादर करणेबाबत कारणे दाखवा नोटीस निर्गमित केलेल्या केलेल्या महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रवेश मान्यता प्रस्तावांबाबत.<br>निर्देश / निर्णय : ....... संबंधित संचालनालयाच्या अहवालानुसार दंडात्मक कारवाई करुन प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे | प्राधिकरणाच्या इतिवृत्तामधील प्रपत्र-ई मधील महाविद्यालयांच्या प्रस्तावास प्रवेश मान्यतेचा निर्णय सर्व संबंधितांना दिनांक १५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आला आहे व प्रपत्र - फ मधील महाविद्यालयांना कळविण्यात येत आहे. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार दंडाची पूर्तता पंधरा दिवसांत करुन त्याचा अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात यावे. तसेच प्रपत्र-क मधिल महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्यास प्रतिबंधीत का करण्यात येऊ नये, याबाबत खुलासा प्राप्त करुन घेण्याचे निर्देश दिले. |
| १३. | १३ | जमनालाल बजाज ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील "प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव" प्राधिकरणास सादर करणे बंधनकारक नसलेबाबत.<br>निर्देश / निर्णय : ....... संचालनालयाचा अहवाल प्राप्त होई पर्यंत व तद्नुषंगाने प्राधिकरणाचा अंतिम निर्णय होई पर्यंत जमनालाल बजाज ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश मान्यते प्रकरणी प्रक्रिया शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहील, याबाबत नोंद घेऊन सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी याबाबत उचित कार्यवाही करावी. | जमनालाल बजाज ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई या महाविद्यालयास अधिनियम २०१५ च्या तरतूदी कोणत्या नियमात लागु नसल्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालय यांना अहवाल सादर करण्याबाबत दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. | प्रस्तूत प्रकरणी संचालनालयाचे अहवालाचे अवलोकन केले असता प्रक्रिया शुल्क न आकारण्याबाबत कोणतेही नियम / निर्णयाचा ठोस उल्लेख नाही. तसेच महाविद्यालयाने सादर केलेल्या पत्रात स्पष्टता दिसून येत नाही. या अनुषंगाने संबंधित महाविद्यालयास प्रक्रिया शुल्क सादर करणे बंधनकारक आहे. सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी याबाबत उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

ज्या महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे, अशा प्रकरणी दंडाची व खुलासा सादर करण्याकरिता १५ दिवसांची मूदत देण्यात येत आहे. विहित कालावधीत पूर्तता न केल्यास पुढील शैक्षणिक वर्षातील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये (CAP) मध्ये समावेश न करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येईल, याची संबंधित महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

**विषय क्रमांक ३ :** **प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळाची पुनर्रचना करणे व प्रवेश मान्यता प्रक्रियेकरिता स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल तयार करण्याच्या मान्यतेबाबत.**

प्रस्तूत प्रकरणी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली. प्रवेश नियामक प्राधिकरणासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली विश्लेषक विकसित करण्याचे विचारधीन असल्याने, प्राधिकरण कार्यालयासाठी प्रणाली विश्लेषकासाठी गरज असल्याबाबत चर्चा करण्यात आली.

तसेच संकेतस्थळाची पुनर्रचना करणे आणि प्राधिकरणाचे संपूर्ण कामकाज ऑनलाईन पध्दतीने करण्यासाठी प्रणाली विकसित करण्याबाबत कामाचे स्वरुप व वस्तूस्थिती पाहून निर्णय घेण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले.

निणर्य :- सदरील प्रस्तावामध्ये प्रस्तावित केल्यानुसार प्रणाली विश्लेषक हे पद कंत्राटी तत्वावर भरण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली.

**विषय क्रमांक ४ :** **प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे अधिनियम, २०१५ च्या तरतूदींनुसार नियम मसुदा तयार करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उपसमितीद्वारे सादर करण्यात आलेल्या अंतरिम अहवाल शासनास सादर करण्याबाबत व उक्त तरतूदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरण बैठक विनियम मसुदयास मान्यतेबाबत तसेच उपसमितीस अहवाल सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम २४ च्या तरतूदींनुसार विनियम मसुदा तयार करण्यासाठी व कलम २३ च्या तरतूदींनुसार नियम मसुदा तयार करण्यासाठी मान. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक १३ अन्वये उपसमिती गठित करण्यात आली.

या उपसमितीस अधिनिमय, २०१५ च्या अंतर्गत करण्यात येणाऱ्या नियम व विनियमांचा मसूदा सादर करण्यास तीन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. या उपसमितीने आतापर्यंत एकुण १८ बैठका घेऊन खालील नियम व विनियमांचा मसूदा सादर केलेला आहे,-

१) सामाईक प्रवेश परिक्षाचे नियम (कलम ४(क))
२) वार्षिक अहवाल नियम (कलम (१९))
३) लेखे तयार करणे नियम (कलम १७)
४) प्राधिकरण बैठक विनियम (कलम ७(७))

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

अ) अधिनियम २०१५ च्या कलम (१९) व कलम (१७) च्या अंतर्गत शासनाकडून नियम अधिसुचित होण्याच्या अधिन राहून उपसमितीने सादर केलेले वार्षिक अहवाल नियम (कलम (१९)) व लेखे तयार करणे नियम (कलम १७) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन मसुदा नियमांनुसार कामकाज करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

ब) तसेच, अधिनियम २०१५ मधील कलम ७(७) नुसार उपसमितीने सादर केलेला प्राधिकरण बैठक विनियम या बैठकीपासून लागू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

क) उपरोक्त उपसमितीस दिनांक १८/०३/२०२५ पासून पुढील तीन महिने दिनांक १७/०६/२०२५ पर्यंत मुदतवाढ देणे उचित होईल तसेच, या उपसमितीने अधिनियमांतर्गत तक्रार निवारण पध्दती व लेखा विषयक कार्यपध्दतीचे विनियम मसुदा सादर करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

तसेच, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ चे अवलोकन केले असता, काही कलम / तरतूदींमध्ये सुधारणा आवश्यक असल्याबाबत एकमताने चर्चा करण्यात आली. याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

- कलम क्रमांक : कायद्यातील तरतूदींनुसार शासकीय कार्यरत सदस्यांना त्यांच्या कामाच्या व्यापामुळे प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित राहणे शक्य होत नाही व त्यामुळे प्राधिकरणास निर्णय घेत असतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या बाबींचा विचार करता अशासकीय सदस्यांची संख्या दोन वरुन तीन ते चार असावी.

- सद्यस्थितीमध्ये माहे ऑगस्ट २०२४ पासून अशासकीय सदस्यांची नियुक्ती शासनाकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता एकही अशासकीय सदस्य कार्यरत नाही या बाबींचा विचार करता कलम ७(४) च्या तरतूदीनुसार अशासकीय सदस्यांचा कार्यकाळ पूर्ण होण्याच्या एक महिन्यापूर्वी नविन सदस्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे किंवा नविन सदस्यांची नियुक्ती होईपर्यंत नियुक्त करण्यात आलेल्या परंतू कार्यकाळ संपलेल्या सदस्यांना सदस्य म्हणुन कार्यरत राहण्यास अनुमती असावी.

- कलम क्रमांक ९(५) (दोन) -महाविद्यालयाने संचालनालयाकडे प्रस्ताव सादर केल्यापासून संचालनालयाच्या पडताळणीसह महाविद्यालयाने प्रवेश मान्यता प्रस्ताव दोन महिन्यांच्या आत सादर करण्याची महाविद्यालयांना सक्ती असावी.

- कलम क्रमांक ९(५) (तीन) - संस्थाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची त्या वर्षांच्या ३१ जानेवारी च्या ऐवजी ३० एप्रिल पूर्वी छाननी व मान्यता प्रदान करण्यास मुदतवाढ असावी.

प्रस्तूत प्रकरणी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी शासनाकडे याबाबत पाठपुरावा करावा. उपरोक्त विषयी सांगोपांग चर्चा करुन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला,-

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

**निर्णय :-**

अ) अधिनियम २०१५ मधील कलम (१९) व कलम (१७) च्या अंतर्गत तयार करण्यात आलेला मसूदा नियम शासनाकडे किंचित दुरुस्तीसह पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे. शासनाकडून नियम अधिसुचित होण्याच्या अधिन राहून उपसमितीने सादर केलेल्या वार्षिक अहवाल नियम (कलम (१९)) व लेखे तयार करणे नियम (कलम १७) या मसूदयातील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन करण्याबाबत ठरविण्यात आले.

ब) अधिनियम २०१५ च्या कलम ७(७) नुसार उपसमितीने सादर केलेला प्राधिकरण बैठक विनियम मसुदा अधिनियम २०१५ च्या अंतर्गत अधिसुचित करण्यात येतील. अशा नियमांच्या अधिन राहून मसूदयातील तरतूदी बैठकीपासून स्विकारण्यास व बैठकीचे कामकाज करण्याचे ठरविण्यात आले.

क) उपसमितीस दिनांक १८/०३/२०२५ पासून पुढील तीन महिने दिनांक १७/०६/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. या समितीने अधिनियमांतर्गत तक्रार निवारण पध्दती व लेखा विषयक कार्यपध्दतीचे विनियम मसुदा या मुदतीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ५ : प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांना सामाईक प्रवेश परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया, वॉर-रुम व प्रवेश मान्यता प्रक्रिया या कामकाजांकरिता मानधन अदा करण्याबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांना सामाईक प्रवेश परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया, वॉर-रुम व प्रवेश मान्यता प्रक्रिया या कामकाजांकरिता मानधन अदा करण्याबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

**निर्णय :-**

प्रस्तूत प्रकरणी प्रस्तावित केल्यानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांना सामाईक प्रवेश परीक्षा (शैक्षणिक वर्ष २०२५-२६), केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (शैक्षणिक वर्ष २०२४-२५) व वॉर-रुम (शैक्षणिक वर्ष २०२५-२६) या कामकाजांकरिता मानधन अदा प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मान्यता देण्यात आल्यानुसार आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष व सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी पुढील कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ६ : प्रवेश नियामक प्राधिकरणाकरिता Hycross ZX (0) Hybrid ७ STR हे नविन वाहन खरेदी करण्याबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरणाकरिता नविन वाहन खरेदी करण्याकरिता सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी या संदर्भात नमूद केले की, अधिनियम २०१५ अस्तित्वात आल्यापासून प्रवेश नियामक प्राधिकरणाकरिता अद्याप वाहन खरेदी करण्यात आलेले नाही, तसेच सद्यस्थितीमध्ये प्राधिकरणास वापरात असलेले वाहन क्रमांक MH-०२-AK-०२७१ हे सन २०१६ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने खरेदी केले असून या वाहनास ९ वर्षे पूर्ण झाली असल्याने वारंवार वाहनाच्या दुरुस्ती व डागडुजीसाठी वाहनाच्या खरेदी रक्कमेच्या ४० टक्केच्या वर खर्च झालेला आहे. त्यामुळे नविन वाहन घेणे आवश्यक आहे. तसेच अधिनियम २०१५ च्या तरतदूींनुसार प्राधिकरण हे स्वायत्त असल्याने नविन वाहन खरेदी केल्यास त्याचा शासनावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नसल्याची बाब स्पष्ट आहे. याबाबत सांगोपांग चर्चा करण्यात आली.

**निर्णय :-**

सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी प्रस्तावित केल्यानुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाकरिता Toyota Innova Hycross ZX (o) Hybrid ७ STR हे नवीन वाहन खरेदी करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच पूर्वीचे वाहन क्रमांक MH-०२-AK-०२७१ हे आवश्यक त्या दुरुस्तीसह कार्यालयासाठी वापरण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ७ : प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील निव्वळ कंत्राटी तत्वावरील गट - क व गट - ड संवर्गातील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

**निर्णय :-**

प्रस्तूत प्रकरणी सर्व बाबी व निकषांचा विचार करुन प्रवेश नियामक प्राधिकरण (प्रपत्र-अ) व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील (प्रपत्र-ब) निव्वळ कंत्राटी तत्वावरील गट - क व गट - ड संवर्गातील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या माहे डिसेंबर २०२४च्या वेतनामध्ये १० टक्के वाढ करण्यास प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे. सदरची वेतनवाढ प्रपत्रात कर्मचाऱ्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या दिनांकापासून लागू राहिल. मान्य वेतनवाढी व्यतिरिक्त अन्य कोणतेही वेतन लागू राहणार नाही. ही वेतनवाढ खालील अटी व शर्तीवर लागु राहील,-

१) या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे दर सहा महिन्यांनी कार्य मुल्यांकन करण्यात यावे.
२) ज्या कर्मचाऱ्यांचे कार्यमुल्यांकन "ब" दर्जापेक्षा कमी असेल अशा कर्मचाऱ्यांची देण्यात आलेली वेतनवाढ त्या दिनांकापासून स्थगित करण्यात येईल.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

**<u>विषय क्रमांक ८ :</u>** **<u>मान. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>**

निरंक

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**(समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से.(से.नि.))**
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य.**

दिनांक : 22 MAY 2025